ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016



Indian Streams Research Journal

# मराठी कथाविश्वातील स्त्री कथाकारांचे योगदान

प्रा. प्रविणा नागपूरकर
महिला महाविद्यालय, नंदनवन नागपूर.

कथा हा ललित साहित्याचा अत्यंत लोकप्रिय प्रकार आहे .कथेचे कथन, वा लेखन ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. हा अती प्राचीन काळापासून चालत आलेला महत्वाचा साहित्यिक गुणधर्म असून आधुनिक साहित्यातही अत्यंत समृद्धपणे आविष्कृत झाला आहे. मानवी जीवनाबद्दलचे कुतूहल साहित्याने आत्मसात केले. वेगवेगळ्या लेखकांनी जीवनाचा विविध तऱ्हेनी विविध स्वरूपाचा वेध घेतला.त्याला त्यांनी शब्दात आकार दिला. म्हणूनच मराठी कथा जिवंत राहिली. समृद्धही झाली.



आधुनिक मराठी कथेचा पाया 'हरीभाऊ यांनी घातला. हरिभाऊंच्या स्फुट गोष्टी पासून आधुनिक मराठी वाङ्मयाचा प्रवास सुरू झाला. मराठी कथा वाङ्मयाला वास्तवाभिमूख करण्याचे कार्य हरिभाऊंच्या गोष्टींनी केले. कथेला त्याकाळी स्वतंत्र घाट दिला. १९२६ ते १९४० या काळातील कथेत घटनांपेक्षा भावनांना अधिक महत्व लाभले. त्याबरोबरच वास्तव जीवनातील पदर मोठ्या कुशलतेने उकलू लागले. खांडेकर याच काळातील होत. कथेच्या अंतरंगात वैशिष्ट्यपूर्णता घालून नावारूपाला आणण्याचे कार्य १९२६ ते १९४० या कालखंडात फडके, खांडेकर यांनी केले, म्हणून या कालखंडाला फडके खांडेकर काळ असे संबोधले जाते. फडके आणि खांडेकरांनी साहित्याला जीवनाभिमुख बनविले.

दुसऱ्या महायुद्धाने जगावर विफलतेची छाया पांघरली ,त्यामुळे जीवनमुल्ये कोसळून पडली. त्यामुळे अंधश्रद्धेला खतपाणी मिळून ती वृती समाजात फोफावली. त्याचे कटू प्रत्ययकारी चित्रण नवकथेतून येऊ लागले. नवकथेतच्या रचनातंत्रात बदल होऊन ती व्यक्ती संशोधनाचे केंद्र बनले. व्यक्तीच्या संदर्भात सामाजिक जाणीव आणि जीवनातील भावभावना कथेतून मांडल्या जाऊ लागली. विद्याधर पुंडलीक, गंगाधर गाडगीळ, जी. ए. कुलकर्णी यांनी मराठी कथेच्या क्षेत्रात विविध प्रयोग केलेत. हे प्रयत्न मराठी कथेच्या प्रारंभापासून पुरुष कथाकारांबरोबर स्त्री कथाकारांनीही केलेले आहे. कथालेखन व स्त्री मनाचे विश्लेषण करण्याच्या जाणिवेतून कथालेखन करण्याकरिता स्त्रीलेखिका समोर

आल्या, स्त्रीमनाचे सखोल विश्लेषण त्यांनी रेखाटले . स्त्रीयांपुढे निर्माण झालेल्या निरनिराळ्या सामाजिक रुढीच्या आणि बदलत्या परिस्थितीच्या कात्रीत सापडल्यामुळे त्यांच्या जीवनाची झालेली परवड या सर्वांचे प्रत्ययकारी चित्रण विभावरी शिरूरकर या टोपण नावाने लेखन करणाऱ्या मालतीबाई बेडेकरांनी केले. त्यांचा 'कळ्यांचे निःश्वास कथासंग्रह खूप गाजला. कृष्णाबाई. कमलाबाई टिळक यांनीही आपल्या कथातून स्त्रीमनाचे पदर अतिशय हळूवारपणे उमलून दाखविले आहेत. याशिवाय क्षमाबाई राव, शांताबाई नाशिककर, कुमुदिनी रांगणेकर, आनंदीबाई किर्लोस्कर, मालतीबाई दांडेकर अशा कितीतरी लेखिकांनी आपल्या कथातून स्त्रीजीवनाच्या समस्या, परंपरा याविषयीचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे केलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीजीवनात सामाजिक बदलामुळे, नवविचारामुळे मोठे स्थित्यंतर घडून आलेत. उच्चशिक्षणाने तिला स्वतःची नवी जाणीव झाली. आपल्या स्थिती-गतीची दुःखे साहित्यातून मांडू लागली पिरोज आनंदकर, कुसुमावती देशपांडे यासारख्या कथालेखीका स्त्रीजीवनातील समस्या, सामाजिक विषमतेची जाणीव, बालमनाची स्पंदने टिपतात.

स्वातंत्र्योत्तर मराठी कथेला आशय आणि अभिव्यक्ती दोन्ही दृष्टीने जी नवी परिमाणे मिळाली ती मिळवून देण्यात कथाकाराइतकाच कथालेखिकांचा महत्वपूर्ण वाट आहे . शतकाच्या वाटचालीत कथाकारांनी पुरुषांच्या कथेत आलेले काही खास असे स्त्रियांचे अनुभव मांडलेले आहेत.त्याचबरोबर पुरुष भेदाच्या पलीकडे जाऊन जीवनातील काही विलक्षण आणि मौलिक अनुभवही त्यांनी कथेतून अधोरेखित केले आहे. वसुंधरा पटवर्धन, शिरीष पै या लेखिकांनी कथाविश्वामध्ये स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहेत. वसुंधरा पटवर्धन यांच्या कथा घटनाप्रधान असून त्या स्त्रीच्या भावजीवनाशी निगडीत आहे. माणसा-माणसातील गुंतागुंतीच्या नात्याचे दर्शन घडविणाऱ्या कथादेखील त्यांनी लिहिल्या आहेत. इंदिरा संत, शांता शेळके, कमला फडके, स्नेहलता दसनूरकर, योगीनी जोगळेकर या लेखिकांनीही आपल्या वेगळ्या परिमाणांच्या कथा लिहिल्या आहेत. विजया राजाध्यक्ष यांचे कथालेखन मराठी कथेच्या संदर्भात महत्वपूर्ण आहे त्यांच्या कथेमध्ये व्यक्तीमनाच्या वेगवेगळ्या सूक्ष्म छटा प्रत्ययकारी रूप घेतात. सरीता पत्की, सरोजीनी बाबर, सुनीती आफळे या कथालेखिका ग्रामीण स्त्रियांच्या जीवनातील सुख-दुःखे आगळ्या वेगळ्या कथानकांचे संदर्भ देऊन कथा संपन्न करतात. रोहिणी कुलकर्णी स्त्रीच्या आत्मजाणिवेच्या अस्मितेचा शोध घेणारे स्त्रीमनाचे दुःख अधिक तीव्र, बोलके, अधिक धारदार करते. त्या स्त्रीमनात सलणारी शल्ये नेमकेपणाने व नीटसपणे मांडतांना दिसतात. वसुधा पाटील या आपल्या कथांमध्ये स्त्रीमनाच्या परस्परविरोधी भावनांची गुतागुंत यशस्वीपणे हाताळतानाच आधुनिक स्त्रीमनाच्या जाणीवा सुद्धा त्या त्यांच्या कथांमध्ये अधोरेखित करतात. अजिता काळे, कमल देसाई यांच्या कथेमधील स्त्रीपात्रांनी स्त्रीजीवनाचा अर्थ नव्या मार्गाने शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. कमल देसाई यांच्या कथा परंपरा व नवता यात हेलकावणाऱ्या प्रामाणिक धाडसी मनाचा अविष्कार करणाऱ्या आहेत. गौरी देशपांडे यांचे आजच्या सर्व लेखिकात स्वतःचे असे वेगळे स्थान आहे. त्याच्या लेखनामध्ये निर्भिड धीट, अभिव्यक्ती व्यक्त होत होती. लग्न संस्था, विवाह-निष्ठा इ. बदद्लची तुच्छता, स्त्री-पुरुष संबंधाची अपरिहार्यतेची जाणीव, मुक्तीसाठी झगडा व खोल वेदनेचा सूर हे विशेष जाणवतात. प्रिया तेंडूलकर या स्त्री-पुरुष संबंधातील निखळ मैत्रीचे चित्रण त्यांच्या कथेत करतात. मानवी नाते संबंधातील एक तरल दृष्टी त्या व्यक्त करतात. स्त्रियांच्या संदर्भात पुरुषी नातेसंबंध त्यांचे वर्तन व त्यामुळे होणारा स्त्रियांचा संकोच. त्यामुळे तिच्या आयुष्यात येणारी अनपेक्षित वळणे याचा वेध त्या आपल्या कथेतून घेतांना दिसतात. आशा बगे या

व्यक्ती जीवनाच्या तळाशी असलेल्या दुःख मांडतात. त्या आपल्या कथेत विषय, आशय अभिव्यक्ती यांच्या एकरूपतेचे अपूर्व रसायन मांडतांना दिसतात. त्यांच्या कथा जीवनाचे कितीतरी अर्थ उलगडून दाखवितात. प्रभावी चित्रणे व काव्यात्मक शैली ही त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे त्यांच्या कथा अव्वल दर्जाच्या ठरतात. मराठी कथा वाङ्मयाच्या क्षेत्रात आशा बगे यांच्या लघुकथा व दीर्घकथांनी मराठी कथेचे दालन समृद्ध केले आहे या दशकातील सानिया हे नावही कथावाङ्मयात अत्यंत महत्वाचे आहे. यांनीही मानवी मनाचे परिस्थिती निरपेक्ष असे एक स्वतंत्र जग जाणून त्याचा वेगवेगळ्या अंगांनी शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कथेतील नायिका मनाने, आचरणाने आणि विचार पद्धतीने स्वतंत्र असून सामान्य स्त्रियांपेक्षा वेगळ्या आहे. प्रसंगी समाजाने ठरविलेल्या पारंपारीक स्त्री व्यवस्थेला बाजूला सारून मानवी नातेसंबंध, भाव-भावना आनंद-दुःख, यांच्या शोधात या अधिक रमतांना दिसतात. गेल्या दशकात कथा लेखिकेने मराठी स्त्री कथा विश्वात पृथगात्मता आणली आहे. कथेच्या उगमापासून तर आजपर्यंत कथेची रूपे बदलत गेली आहेत . प्राचीन काळा पासून अत्यंत लवचिक असा वाङ्मय प्रकार म्हणून कथा वाङ्मय नावारूपाला आले आहे. काळाच्या ओघात सुद्धा कथेचा लवचिकपणा आजही कायम आहे. याच वेगळेपणातून कथा वाङ्मय टिकून आहे. त्यामुळे मराठी कथेला समृद्ध व परिपक्व असे आयुष्यही लाभले आहे मानवी जीवनाच्या विविध पैलुंवर स्त्रियांच्या कथा वाङ्मयाने भर दिलेला आहे. विशेषतः स्त्रियांच्या अनेक समस्यांचे अवलोकन सूक्ष्मपणे स्त्रीच करू शकते. म्हणूनच स्त्री कथा वाङ्मयात स्त्रीयांच्या आंतरिक आणि बाह्य गुण दोषांवर त्या सूक्ष्म छटा उमटविण्यात यशस्वी झालेल्या आहेत.

## संदर्भ ग्रंथ :

१) साने गीता : भारतीय स्त्रीजीवन ,मौज प्रकाशन ,मुंबई ,१९८६
२) सोमण अंजली :मराठी काठेच स्थितिगती ,प्रतिमा प्रकाशन ,पुणे ,१९९५
३) राजाध्यक्ष विजया आणि इतर :कथाशताब्दी ,ग्रंथाली प्रकाशन ,मुंबई,१९९३
४) संपा . लिंबाळे शरणकुमार :समकालीन साहित्य ,मधूराज प्रकाशन ,पुणे.
५) डॉ . वरखेडे मंगला : स्त्रियांची नवकथा :वाटा आणि वळणे , कैलास राजा प्रकाशन,नाशिक १९९६
६) देशमाने अशोक :मराठी कथा :रूप आणि स्वरूप ,चिन्मय प्रकाशन ,